# प्रकरण दुसरे

# "व्यक्तिचित्रण" एक वाङ्मय प्रकार

## – प्रकरण दुसरे –

## – "व्यक्तिचित्रण" एक वाड्.मय प्रकार –

---

व्यक्तिचित्र या लेखन प्रकारासाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक नावांपैकी 'व्यक्तिचित्र' हेच नांव या लेखनप्रकारासाठी कसे योग्य आहे यासंबंधी अनेक नावाचा विचार करून विवेचन केले परंतू व्यक्तिचित्र म्हणताच बहुसंख्य वाचक, अभ्यासकांच्या मनांत शंका येते की, व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार स्वतंत्रपणे अस्तित्वांत असताना दिसतो तसेच वाड्.मयाच्या बहुसंख्य प्रकारांमध्ये व्यक्तिमत्वाचे दर्शन घडत असते. वाड्.मयाच्या निरनिराळया प्रकारात घडणारे हे दर्शन म्हणजेच व्यक्तिचित्र असते की नाही? तर त्याला उत्तर असे की ते व्यक्तिचित्र नसून व्यक्तिचित्रण असते. आता व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यात फरक कोणता? असा प्रश्न येतो. व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांचा काही संबंध असतो का असे प्रश्न उपस्थित होतात.

व्यक्तिचित्र आणि इतर वाड्.मय प्रकार यांचा काही संबध असतो असे वाटणे साहजिक असते. कारण 'व्यक्तिचित्र' या लेखन प्रकारासंबंधी त्याच्या उगमासंबंधी निश्चितता नाही. कुणी म्हणते 'व्यक्तिचित्र' हा कथेचा एक प्रकार आहे तर कुणाच्या मते तो चरित्रवाड्.मयाचाच एक उपप्रकार आहे, तर कुणी त्याला 'व्यक्तिपर' निबंध असेही समजतात.

सर्वच वाड्.मय प्रकारांचा कुठेतरी आंतरिक संबंध येत असतो. त्यामुळे असे घोटाळे होत असावेत. ही वाड्.मय प्रकारांची पुष्पे निरनिराळी दिसली तरी त्यांना जोडणारा धागा एकच असतो. या कारणामुळे सर्वच वाड्.मय प्रकारात आत्माविष्कार, भाषेचे कार्य, नाटय, काव्यात्मता, संवाद, वातावरण निर्मिती, लेखकाचा दृष्टीकोण इत्यादी अनेक घटक कमी अधिक संख्येने कमी अधिक प्रमाणात पाहावयास मिळतात. अशा तऱ्हेने सारखेपण जर सर्व वाड्.मय प्रकारात आढळते व असे असूनही ते वाड्.मय प्रकार स्वतंत्र राहू शकतात तर इतर वाड्.मय प्रकाराशी तुलना करून व्यक्तिचित्र या लेखन प्रकाराचे अनन्यसाधारणत्व, वेगळेपण या तुलनेतून काही दिसून आले तर त्याचा

उपयोग 'व्यक्तिचित्र' या लेखनप्रकाराला स्वतंत्र वाड्.मय प्रकाराचा दर्जा मिळविण्यासाठी निश्चितच होईल. याखेरीज रूढ असणारे स्वतंत्र वाड्.मय प्रकार आणि व्यक्तिचित्र यांच्यात दर्जात्मकदृष्टया काय फरक आहे हे समजून येईल. ललित गद्य या व्यापक कप्प्यांत व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार सध्या समाविष्ट करतात, तेव्हा ललित गद्यांतर्गत अन्य लेखनप्रकारांच्या व्यक्तिचित्राशी होणाऱ्या तुलनेतून व्यक्तिचित्राचे वेगळेपण आणि स्वतंत्र वाड्.मय प्रकाराच्या दृष्टीने काही मोठेपणा पाहता येईल. या साऱ्या तुलनांसाठी सर्व वाड्.मय प्रकारांमागील साहित्याची समान असणारी पार्श्वभूमी, वाड्.मय प्रकारांची होणारी निर्मिती आणि वाड्.मय प्रकारांचे केले जाणारे वर्गीकरण यांचा मूलभूत शोध घेणे आवश्यक ठरेल.

**प्रकरणाची व्याप्ती :-**

साहित्यासंबंधी विचार करून साहित्याची समान असणारी पार्श्वभूमी पाहणे योग्य ठरेल. साहित्य किंवा वाड्.मय हे शब्द साधारणपणे एकाच अर्थाने वापरले जातात. प्रस्तुत चर्चेत साहित्य किंवा वाड्.मय या शब्दांतून ललित साहित्य किंवा ललित वाड्.मय हाच अर्थ अभिप्रेत आहे. कारण ललितेतर साहित्य किंवा विषय येथे अप्रस्तुत आहे.

**वाड्.मय प्रकारामागील समान साहित्य तत्व :-**

साहित्य हा शब्द 'सहित' या शब्दापासून तयार झाला आहे. तसेच वाड्.मय हा शब्द 'वाक्' म्हणजे वाणी या शब्दापासून तयार झाला आहे. वाणीवाटे किंवा वाचेने जे बोलले जाते ते वाड्.मय आणि त्याचाच भाग ललित वाड्.मय हा होय. सहित या शब्दापासून प्रश्न येतो की सहित कशाचे? तर शब्दाचे आणि अर्थाचे शब्दार्थाचे सहित हे खरे, परंतू साहित्यात कोणतेही शब्द येत नाहीत तर निवडक आणि सहेतुक असेच शब्द येतात आणि शब्दांपाठोपाठ त्यांचे अर्थ येतात. साहित्य किंवा वाड्.मयात असे शब्दार्थ येतात ते कोणत्या हेतूने? हा महत्वाचा प्रश्न आहे.

माणूस जगत असतो, जगताना त्याला अनेक अनुभव येत असतात. हे अनुभवमाणूस आपल्या मनात साठवून ठेवत असतो. माणसाच्या ठिकाणी एक स्वाभाविक प्रवृत्ती असते की जे आपल्याला अनुभवण्यास मिळाले त्यात जर काही वेधक, लक्षणीय, वेगळे, चित्ताकर्षक असेल ते दुसऱ्याला सांगावे जे कांही दुःख वाटयाला आले असेल ते समानपणे भोगावे आपले मन मोकळे करावे. दुसऱ्याचेही मन मोकळे करावे घडून गेलेल्या गोष्टींचा पुनःप्रत्ययाने आनंद घ्यावा. घडणे अशक्य

असल्यास स्वप्नरंजन करून घेऊन कल्पनेच्या साम्राज्यात जाऊन त्याचा आनंद घ्यावा. या आत्माविष्काराचा अनुभव देण्या--घेण्याच्या हेतूने साहित्याची निर्मिती केली जाते. शब्दार्थाचे सहिततत्त्व केले जाते. साहित्य किंवा वाङ्.मय हे या हेतूपूर्तीचे माध्यम असते.

मानवी जीवनातील अनुभव साहित्यात संक्रांत होतो तो काही जसाच्या तसा होत नाही. त्याच्यावर काही संस्कार होतात. हे संस्कार होताना माणूस प्रथम विचार करतो की, आपला हा अनुभव दुसऱ्यांसमोर मांडावा का? जर मांडावयाचा असेल तर कोणत्या स्वरूपात मांडावा? यासाठी त्या कल्पनेचे साहाय्य घ्यावे लागते. मूळ अनुभवावर कल्पितांचा संस्कार होतो आणि त्याचांच उत्कट आविष्कार साहित्यातून होतो. अर्थात या अनुभवामागे भावना ही प्रधान असते. उत्कट भावनेखेरीज अनुभव घेण्या–देण्याची प्रक्रिया घडणे कठीण असते. त्यामुळे सर्व वाङ्.मयात अनुभव आणि त्याचा अविष्कार हा कायम असतो व त्यासाठी भावना, कल्पना, विचार ही वाङ्.मयाची तीन अंगेच उपयोगात आणली जातात. त्यामुळे इतर ललित कलांप्रमाणेच जीवनातील सौंदर्याचे दर्शन घडविणे, मनाला आनंद देणे हे वाङ्.मयाचे उद्‌दीष्ट आहे. वाङ्.मयाच्या वाचनातूनच त्याच कलात्मक आनंदाचा किंवा सौंदर्याचा प्रत्यय आपणांला येत असतो. अन्यथा कलाकृतीतील कला ही मनाला भिडणे अशक्य असते व हे कार्यही वाङ्.मय करते. कलेतील मूळ सौंदर्य किंवा आनंददायी गाभा, अनुभव हा विशिष्ट रूपात आपल्यासमोर येत असतो. आणि हा घाट परिणामाच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो. विषय मांडणी आणि परिणाम या वाङ्.मयकलेच्या घटकांमुळे कलेचे उद्‌दीष्ट साध्य होत असते. हेच वाङ्.मय कलेचे घटक आणि उद्‌दिष्ट यांचा प्रत्यय आपल्याला वाङ्.मयाच्या विविध प्रकारांमध्ये येत असतो.

वाङ्.मयात अनुभव महत्वाचा असतो. म्हणजे तरी काय? तर अनुभव घेणारा माणूस आणि ज्या ठिकाणाहून माणूस अनुभव घेतो ते मानवी जीवन हेच महत्वाचे असते. या दोहोंतही वाङ्.मयात साहित्यविषय म्हणुन मानवी जीवन किंवा मानवी समाज यांना कितपत महत्व आहे? तर प्रा.रा.श्री. जोग यांनी निःसंदिग्धपणे असा निष्कर्ष काढला आहे की, "साहित्य निर्मितीची मानसिक प्रक्रिया, साहित्याच्या इतिहासावरून निघणारा निष्कर्ष, ज्या मानव जीवनाचे साहित्य हे वास्तव असे दर्शन त्या जीवनाची मूलभूत प्रवृत्ती आणि अर्थव्याप्ती वाढवीत राहण्याची व त्या प्रमाणात व्यक्तिव्याप्ती कमी करीत जाण्याची साहित्यकृतीची कार्यपद्धती या सर्वांचा रोख साहित्याचा विषय

समाज नूसन व्यक्ती आहे हे दाखविण्याकडेच आहे हे मान्य करावे लागते"(1) साहित्याचा विषय व्यक्ती आहे हे एकदा मान्य केले म्हणजे त्याचे स्वरूप अधिक स्पष्ट होऊ लागते. या संदर्भात वसंत कानेटकरांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्या मते, "ललित वाड्.मयाचे सर्व प्रकार म्हणजे कमी–अधिक प्रमाणात माणसाने माणसांसाठी केलेला माणसांचा शोध होय."(2) साहित्य किंवा साहित्यप्रकार मातूनहेच दृष्टोपत्तीस येते.

मानवातील जे जे लक्षणीय ते ते वाड्.मयात येत असते. निरनिराळया वाड्.मय प्रकारांमधून दिसत असते आणि इतर वाड्.मय प्रकारांप्रमाणेच व्यक्तिचित्राच्या मुळाशी मानवातील किंवा विशिष्ट अशा वर्ण्य व्यक्तीमधील लक्षणीय असे काही दाखवावे हीच प्रवृत्ती प्रमुख असते. यादृष्टीने माणसाला माणसाविषयी वाटणारे कुतूहल पूर्ण करण्याचे साहित्य हे साधन ठरते.

थोडक्यात वरील विवेचनावरून असे ध्यानात येते की, साहित्य किंवा वाड्.मय यात अंतर्भूत होणारे तत्व हे सर्व वाड्.मय प्रकाराच्या मुळाशी समान आहे. जे मुळात आहे तेच त्याच्या अंशभागात असणार हे उघड आहे. साहित्य किंवा वाड्.मय तत्व एकच आहे. फक्त निरनिराळया वाड्.मय प्रकारांद्वारे दिसणारी त्याची रूपे मात्र भिन्न आहेत. याचाच प्रत्यय आपल्याला व्यक्तिचित्र आणि अन्य प्रचलित–अप्रचलित वाड्.मय प्रकार यांच्या तुलनेत तसेच व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांचा संबंध स्पष्ट करताना येऊ शकेल.

**सर्वसमावेशक प्रकार काव्य व वाड्.मय प्रकारांची निर्मिती :–**

सर्व वाड्.मय प्रकारांच्या मुळाशी असणारे वाड्.मय एकच असल्याने साहित्य प्रकारांची जाणीव नसलेल्या वाड्.मय प्रकार पूर्व काळात सरसकट रचना झालेली दिसते. वाड्.मयाचा उल्लेख केवळ 'काव्य' या एकाच सर्वसमावेशक शब्दाने होत होता आणि त्यातच नाटकासारख्या पूर्वीपासून प्रगत असणारा वाड्.मय प्रकारही अंतर्भूत होत होता. मग हे वाड्.मय प्रकार निर्माण तरी कधी झाले असावेत? तर डॉ. आनंद यादवांच्या मते जेव्हा वाड्.मयाला प्राकारिक शिस्त लागू लागली त्यावेळी त्यातील एकेक घटकाला महत्व येत गेले असावे आणि त्यातून एक एक असे वाड्.मयाचे प्रकार निर्माण झाले असावेत. उदा -- विचार प्रधानतेला महत्व देताना निबंधाचा जन्म झाला असावा तर नाटयाला महत्व देत असताना नाटकाची निर्मिती स्वतंत्रपणे झाली असावी, परंतु वाड्.मयाची निर्मिती

ही केवळ वरवर घडून येणारी घटना नाही. प्रा. गं.ब. ग्रामोपाध्ये यांचे मत या संदर्भात लक्षणीय आहे. ते म्हणतात – "वाड्.मय प्रकाराच्या मनात निर्माण होणाऱ्या सृष्टीशी जी त्याची तादात्म्यावस्था असते ती यथातथ्यपणे व्यक्त करण्यासाठी त्याला मूळ सृष्टीशी अनुरूप अशा तऱ्हेचे माध्यम वापरावे लागते... हे माध्यम मुख्यतः प्रतिमांचे असले तरी त्या प्रतिमासुद्धा अनुरूप अशा तऱ्हेनेच व्यक्त कराव्या लागतात. या प्रक्रियेतून निरनिराळे वाड्.मय प्रकार निर्माण झाले."(3)

नवीन वाड्.मय प्रकाराची निर्मिती होताना आशय आणि त्याची होणारी अभिव्यक्ती याना महत्व असते. लेखक जी अनुभूती घेतो त्यावर संस्कार होऊन आशय तयार होतो. हा आशय व्यक्त होताना एका विशिष्ट रूपातच प्रकट होत असतो. हे रूप किंवा हा घाट ही त्या आशयाचीच मागणी असते. किंबहुना आशयातील लयबद्ध रचनेतच हा घाट दडलेला असतो. श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृतीत आशय आणि त्याची अभिव्यक्ती यांच्यात अभिन्नत्व असते. अनुभव आणि त्याने स्वीकारलेले माध्यम यांच्यात केवलतत्व असते. थोडक्यात वाड्.मय प्रकार हे विचार विकार प्रकट करण्याचे माध्यम असते.

नवा वाड्.मय प्रकार किंवा नवीन फॉर्म ही एक नवी अनुभूती असते. त्या वाड्.मय प्रकारात व्यक्त झालेल्या अनुभूतीच्या वेगळेपणामुळे तो वाड्.मय प्रकार वेगळा उठून दिसतो. अनुभूतीचे वेगळेपण किंवा नवेपण म्हणजे तिचा प्रत्यय नवेपणाने येत असतो. आणि हा प्रत्यय 'अर्थपूर्ण' झालेला असल्याने त्यात नाविन्य येते. अनुभूती एका तात्विक पातळीवर गेली म्हणजे तिला सर्वस्पर्शी स्वरूप येते व ती अर्थपूर्ण बनते.

वाड्.मय तत्व एक असूनही आशयामुळे नवीन वाड्.मय प्रकार निर्माण होतात. पण वाड्.मयप्रकारामधील वेगळेपण काही एका मर्यादेपर्यंतच असावे असे प्रा. वा.ल. कुलकर्णींना वाटते. या संदर्भात स्पष्टीकरण करताना प्रा. कुलकर्णी म्हणतात, "प्रत्येक वाड्.मय प्रकाराची पृथगात्मता जाणवणे एका दृष्टीने आवश्यक आणि अपरिहार्य असते. त्या वाड्.मय प्रकाराला होत असलेल्या आत्मस्वरूप प्रतीतीचे आणि आत्मसामर्थ्य प्रतीतीचे ते एका मर्यादेपर्यंत लक्षण असते परंतु आपण इतर लेखन प्रकारापासून वेगळे आहोत ह्याची जाणीव ते वाड्.मय प्रकार सतत व्यक्त करीत राहणे वेगळे.. एखादे लेखन जेव्हा ही जाणीव व्यक्त करू लागते तेव्हा त्याने आपल्या विकासाच्या कक्षा आपल्याच

हाताने सीमित केल्या असे समजावयास हरकत नसावी... प्रत्येक खऱ्या अर्थाने जिवंत असलेली वस्तु ही खरी म्हणजे आगळीच असते. पृथगात्म असते."(4)

प्रत्येक वाड्.मय प्रकार पृथगात्म असला तरी ललित वाड्.मयाचे सर्व प्रकार एकाच वाड्.मयीन जातीच्या उपजाती असल्याने त्याचे परस्परांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच एका वाड्.मय प्रकाराच्या आधाराने दुसरा वाड्.मय प्रकार प्रत्यक्षाप्रत्यक्ष विकास पावणे संभवनीय आहे.

**वाड्.मय प्रकारांचे वर्गीकरण :–**

वाड्.मय प्रकारांच्या निर्मितीनंतर त्यांच्या वर्गीकरणाची कल्पना आली. वाड्.मयाचे दोन भाग करण्यात आले –

1. ललित वाड्.मय आणि
2. ललितेतर वाड्.मय


परंतु प्रस्तुत चर्चेत ललितेतर वाड्.मयाचा काहीच संबंध नाही. म्हणून फक्त ललित वाड्.मयाचाच विचार करणे योग्य ठरेल. ललित वाड्.मयाचे वर्गीकरण करताना 'व्यक्तिचित्रां'चा समावेश कोणत्या प्रकारात होतो याचाही विचार करणे आवश्यक आहे.

ललित वाड्.मयाचे दोन प्रमुख भाग पडतात.


1. गद्य वाड्.मय आणि
2. पद्य वाड्.मय. यापैकी पद्य वाड्.मयात स्वतंत्रपणे 'व्यक्तिचित्रे' येऊ शकतात. उदा. समर्थ रामदास स्वामींनी शिवाजीमहाराजांना लिहिलेले "निश्चयाचा महामेरू। बहुत जनासी आधारू।" हे सुप्रसिद्ध गुणवर्णन पत्र. किंवा कै. बा. सी. मर्ढेकरांची 'गणपत वाणी' ही कविता. पद्यमय व्यक्तिचित्रे दिसून येतात.

गद्य वाड्.मयामध्ये 1) प्रचलित वाड्.मय प्रकार आणि 2) अप्रचलित वाड्.मय प्रकार असे दोन मुख्य विभाग पडतात. यापैकी प्रचलित वाड्.मय प्रकारांची त्यांच्या उपप्रकारांसह रूढ असणारी विभागणी पुढील प्रमाणे मांडता येईल.

**– प्रचलित वाड्.मयप्रकार –**




अप्रचलित वाड्.मय प्रकारांमध्ये ज्या लेखनप्रकारांना स्वतंत्र वाड्.मय प्रकाराचा दर्जा प्राप्त झालेला नाही अशा लेखन प्रकारांचा समावेश होतो. या सर्व विभागाला ललितगद्य असेही संबोधण्यात येते. प्रचलित वाड्.मय प्रकारांचे उपप्रकार म्हणून मानले गेलेले काही लेखनप्रकार ललित गद्यामध्ये येताना दिसतात. तसेच त्या उपप्रकारांचेही उप उपप्रकार पडलेले दिसतात. या साऱ्या अप्रचलित वाड्.मय प्रकारांची रूढ असणारी विभागणी पुढील प्रमाणे --




वरील विभागणी (प्रचलित – अप्रचलित वाङ्.मय प्रकारांची) पाहिली की व्यक्तिचित्र लेखन प्रकारावर किती वाङ्.मयप्रकार – उपप्रकारांचा हक्क दाखविला जातो याची कल्पना येते.

**व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण :–**

व्यक्तिचित्रण हा अनेक वाङ्.मय प्रकारातील एक महत्वाचा घटक आहे. तसाच तो ललित वाङ्.मयाचा महत्वाचा भाग आहे. व्यक्तिचित्रण किंवा व्यक्तिदर्शनाचा अर्थ देताना असे म्हटले आहे की व्यक्तिदर्शन म्हणजे, ''शब्दांनी उभे केलेले विशिष्ट व्यक्तीचे चित्र''(5). व्यक्तिदर्शनाचा हा अर्थ सकृतदर्शनी योग्य वाटला तरी तो व्यक्तिचित्राचे केवळ वरवरचे स्वरूप सांगतो. त्यामधील हेतू

किंवा वाङ्.मयातील त्याचे महत्व इत्यादिविषयी विचार हा अर्थ सांगत नाही. व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाङ्.मय प्रकारातील व्यक्तिचित्रणाचा विचार केला तर असे दिसते की, व्यक्तिचित्रणाचे त्या त्या वाङ्.मय प्रकारात किंवा कलाकृतीत कितीही महत्व असले तरी व्यक्तिचित्रण हे कायम दुय्यम स्थानावरच येते. निखळ व्यक्तिचित्रण हा हेतू त्यात कधीही नसतो. मुळात काही तरी वेगळे दाखविण्यासाठी व्यक्तिचित्रण फार तर प्रभावी केले जाते इतकेच. त्यामुळे व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाङ्.मय प्रकारातील व्यक्तिचित्रण कितीही जिवंत, प्रत्ययकारी व सत्यानुभूतीवर आधारित असले तरी देखील ते स्वतंत्र नसते. प्रथम स्थानावरील नसते. थोडक्यात व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाङ्.मय प्रकारात येणारे व्यक्तिचे वर्णन किंवा दर्शन हे व्यक्तिचित्र नसून व्यक्तिचित्रण असते व ते साधनरूप असते. व्यक्तिचित्रातील व्यक्तीचे साध्य रूपाने येणारे व स्वतंत्र आणि प्रथम स्थानचे म्हणून हेतूपूर्वक केलेले व्यक्तीचे वर्णन आणि अन्य वाङ्.मयप्रकारातील दुय्यम स्थानी येणारे व्यक्तिचित्रण यांच्यातील फरक समजण्यासाठी व्यक्तिचित्र व व्यक्तिचित्रण हे दोन भिन्न शब्द संदर्भानुसार भिन्न भिन्न अर्थाने वापरणे जरूरीचे आहे. यात वापर करण्यात जर चुक झाली तर त्याचा संदर्भ बदलतो हे वरील विवेचनावरून लक्षात यावे.

व्यक्तिचित्रणाबद्दल एवढी चर्चा केल्यानंतर व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यातील फरक पाहावा लागेल. तो पाहताना व्यक्तिचित्रणाचे स्वरूपही स्पष्ट होईल. या ठिकाणी एक गोष्ट आधीच स्पष्ट केली पाहिजे की, ही तुलना व्यक्तिचित्रण ही संकल्पना व व्यक्तिचित्र यांच्यात होईल. विशिष्ट वाङ्.मय प्रकारातील व्यक्तिचित्रणाची तुलना स्वतंत्रपणे केलेली नाही. कारण त्या प्रकारची बरीचशी तुलना त्या त्या वाङ्.मय प्रकारांची व्यक्तिचित्राशी तुलना करताना केली आहे.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांच्यात गल्लत केली जाण्याची शक्यता असते. कारण त्यांच्यात काही साम्य भासते. व्यक्तिरेखा काढताना वर्ण्य व्यक्तीची मनोरचना, भाषा, शरीराची हालचाल याचा उपयोग होतो. व्यक्तिचित्र रेखाटनात देखील या बाबी येतात. व्यक्तिचित्रण आणि व्यक्तिचित्र दोन्हीतही व्यक्तिरेखाटन करताना व्यक्तीच्या कृती उक्तीला महत्व येते. यामधून व्यक्तीचे प्रत्यक्ष दर्शन घडावे ही अपेक्षा व्यक्तिचित्र व व्यक्तिचित्रणात असते. व्यक्तिचित्रा प्रमाणेच व्यक्तिचित्रण करताना व्यक्तीच्या बाह्यांगाची ओळख करून दिल्यानंतर लेखक त्याच्या अंतरंगाकडे वळतो.

दोन्हीतही वर्ण्य व्यक्तीचे गुणदोष वर्णन केलेले असतात. तसेच परिणामकारकतेसाठी दोन्हीतही पाल्हाळ चालत नाही. या प्रकारचे साम्य व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रणात असले तरीदेखील हे साम्य अतिशय वरवरचे बाह्य स्वरूपातील आहे. त्यामुळे व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यात घोटाळा होण्याचे कारण नाही. व्यक्तिचित्र व व्यक्तिचित्रण या दोहोंतील फरक पाहिला म्हणजे याबाबत अधिक स्पष्टपणा येईल.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांच्यात साम्यापेक्षा भेदच अधिक दिसतो. व्यक्तिचित्र हा मूळचा शब्दचित्रातीलच एक प्रकार आहे. व्यक्तिचित्रालाच बरेचजण शब्दचित्र हा शब्द वापरतात. त्या दृष्टीने शब्दचित्रातील व्यक्तिरेखा (व्यक्तिचित्र) आणि विविध लेखन प्रकारातील व्यक्तिरेखा (व्यक्तिचित्रण) यांच्यातील अंतर हे स्थिरचित्र आणि चलत्‌चित्र यातील अंतराप्रमाणे असते असे बाळ शंकर देशपांडे यांचे मत आहे.

सर्वसाधारण विचार केला तरी असे दिसून येते की व्यक्तिचित्रण व व्यक्तिचित्र यांचे स्वरूपच भिन्न आहे. व्यक्तिचित्रण हे वाङ्‌मयात साधन रूपाने अवतरते तर व्यक्तिचित्र हे स्वतंत्रपणे साध्य रूपाने अवतरते. व्यक्तिचित्र हा वेगळा लेखनप्रकार आहे तर व्यक्तिचित्रण अनेक वाङ्‌मय प्रकारात आढळून येणारा एक घटक आहे. व्यक्तिचित्राप्रमाणे व्यक्तिचित्रणाला स्वतंत्र अस्तित्व नाही. व्यक्तिचित्रण हे वाङ्‌मयांतर्गत घटक असल्याने ती खऱ्या अर्थाने नवनिर्मिती नसते. इतकेच नव्हे तर ह्या बऱ्याच व्यक्ती नसून व्यक्ती नमुने असतात.

व्यक्तिचित्रात नवनिर्मिती होऊ शकते. अर्थात प्रत्येक व्यक्तिचित्र हा नवनिर्मितीचा नमुना असेलच असे नाही. कारण या ठिकाणी निर्मितीसाठी व्यक्तीचा आधार लागतो. कल्पना चालत नाही. ज्या कारणामुळे चरित्र वाङ्‌मयाला निर्माणक्षम म्हणण्यात येत नाही त्याचप्रमाणे हा नियम व्यक्तिचित्रालाही लागू पडेल. परंतु चरित्रातील निर्माणक्षमता व व्यक्तिचित्रातील निर्माणक्षमता यात काही वेळा फरक करता येतो.

चरित्र लिहिताना ऐतिहासिक दृष्टी अधिक प्रभावी असते. चरित्रात पुरावे आवश्यक असतात. त्यामुळे अन्य व्यक्तींच्या व्यक्तित्वाच्या छटा चरित्रात दाखविता येणे हे केवळ अशक्य असते. याउलट व्यक्तिचित्रात सत्याच्या आधाराला कल्पनेची महिरप चालू शकते; तसेच निरनिराळया दोन तीन

व्यक्तीचे विशेष एकत्र करूनही एखादे व्यक्तिचित्र निर्माण करता येऊ शकेल. उदा. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं'मध्ये हा प्रयोग करण्यात आला आहे. 'मुलाण्याचा बकस', 'रघु कारकून', 'शिवा रामोशी' या व्यक्तिचित्रांमध्ये एकच एक व्यक्ति लेखकाच्या डोळयासमोर नव्हती. निरनिराळया दोन--तीन व्यक्तींच्या विशेषांचे मिश्रण ही व्यक्तिचित्रे लिहिताना झाले आहे असे लेखकाचे म्हणणे आहे. या ठिकाणी व्यक्तिचित्रात नवनिर्माणक्षमता आली असे म्हणता येईल.

व्यक्तिचित्रणातील व्यक्ती रेखाटताना व्यक्तिदर्शनाऐवजी व्यक्ती निरूपणात्मक रूप येते. मात्र व्यक्तिचित्र काढताना अलिप्त रेखाटनाने व्यक्तिचित्राची परिणामकारकता वाढते व यातूनच वस्तुनिष्ठता येऊ शकते. ही वस्तुनिष्ठता व्यक्तिदर्शनाप्रमाणेच व्यक्तिनिरूपणासही मदत करते. व्यक्तिचित्रात व्यक्तिदर्शन व निरूपण दोन्हीही येते. व्यक्तिचित्रणात मात्र केवळ निरूपण येते.

व्यक्तिचित्र स्थिर असते तर व्यक्तिचित्रणात गतिमानता असते. व्यक्तिचित्रणात पात्राचा विकास आवश्यक असतो. व्यक्तिचित्रण हे संपूर्ण कलाकृतीचा एक भाग असल्याने व्यक्तिचित्रणात विकासाच्या अनेकविध शक्यता असतात. कारण या ठिकाणी प्रमुख व्यक्तिखेरीज इतरही व्यक्तिरेखा असतात. आणि यांच्यातील भिन्नभिन्न परस्पर संबंधांना वाव मिळतो. या संबंधातून व्यक्तिचित्रणाची गतिमानता, विकासक्षमता वाढत असते. परंतु व्यक्तिचित्र स्थिर असते. याचा अर्थ ते जिवंत नसते असा मात्र नाही. व्यक्तिचित्र सूक्ष्म काही गुणांपुरते मर्यादित असले तरी त्याची रचना अशी असावी की वर्ण्य व्यक्ति मनःचक्षूसमोर साक्षात उभी राहावी, असा जिवंतपणा त्यात असावा. व्यक्तिचित्रण मात्र लेखनप्रकारानुसार स्थूल, सूक्ष्म, काही गुणांपुरते किंवा संपूर्ण दर्शन घडविणारे असे असू शकते. व्यक्तिचित्रण मात्र अनेक पदरी असते.

व्यक्तिचित्रणात व्यक्तिमत्वाचा प्रवास असतो. वर्ण्य व्यक्तीच्या जीवनातील चढउतार त्यात येतात. योगायोग येतात. अनपेक्षितपणातून येणारे नाटय त्यात येते आणि हे सारे दाखविताना त्यात एक सुसंगती अभिप्रेत असते. याउलट व्यक्तिचित्रात प्रथम बाह्यांग ओळख करून दिली जाते, केवळ बाह्यांग न दाखविता. अंतरंगाचीही ओळख करून दिली जाते. वर्ण्य व्यक्तीचे गुणदोष चर्चिले जातात. यामुळे व्यक्तिचित्रे स्थितिशील तर व्यक्तिचित्रणे गतिशील बनतात.

व्यक्तिचित्रण दोन पद्धतीने केले जाते.

1) वर्णनात्मक पद्धती

2) दर्शनात्मक पद्धती.

वर्णनात्मक पद्धतीत लेखक स्वतः विश्लेषण करीत व्यक्तिचित्रण करतो तर दर्शनात्मक पद्धतीत नाटयात्मकतेला महत्व असते. इतर पात्रे संवाद निरनिराळे प्रसंग व कृती यातून स्वभावदर्शन घडविले जाते. व्यक्तिचित्राचा विचार केला तर त्यात एकच व्यक्ति असते व तीच महत्वाची असते त्यामुळे त्या व्यक्तीच्या संदर्भात जर अन्य व्यक्तींचा उल्लेख झाला तरी इतर पात्रे त्यांच्या कृती इत्यादी दर्शनात्मक पद्धतीमधील बाबींना व्यक्तिचित्रात महत्व नाही. त्यामुळे व्यक्तिचित्रात वर्णनात्मक पद्धती येते.

व्यक्तिचित्रणाचे निरनिराळया वाड्.मय प्रकारात होणारे अवतरण अनेक हेतू धरून झालेले असते. मनोरंजनासाठी व्यक्तिचित्रण आवश्यक ठरते. तसेच कथानक पुढे सरकण्यासाठी किंवा लेखकाचा जीवनविषयक दृष्टीकोणाचे साधन म्हणूनही व्यक्तिचित्रण केले जाते. व्यक्तिचित्र मात्र 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्र' या एकाच नेमक्या मर्यादित हेतूसाठी अवतरते. काही वेळा व्यक्तिचित्र लेखनासाठी कारण होणारे प्रसंग वेगवेगळे असू शकतील पण त्यामुळे व्यक्तिचित्राच्या हेतूत फरक पडत नाही. फरक पडलाच तर तो प्रसंगानुसार व लेखकाच्या मनोधर्मानुसार व्यक्तिचित्राच्या स्वरूपात पडू शकतो. उदा. एकसष्ठी, सत्कार, मृत्यू अशा प्रसंगी लिहिली जाणारी व्यक्तिचित्रे ही जास्ती करून गुणवर्णनपर बनतात पण त्यामागील हेतू कायमच असतो.

व्यक्तिचित्रण करताना लेखक आपल्या मनाशी काही कल्पना निश्चित करतो आणि त्यानुसार व्यक्तिचित्रण करतो. यामुळे व्यक्तिचित्रण केलेल्या व्यक्तीवर लेखकाच्या मनोवृत्तीची बंधने पडतात. व्यक्तिचित्रात मात्र हा प्रकार घडत नाही. किमान निर्दोष व्यक्तिचित्रासाठी असे घडू नये ही अपेक्षा असते. व्यक्तिचित्र रेखाटताना जशी व्यक्ती असेल तशी ती रेखाटली जाणे महत्वाचे असते, फक्त लेखकाची मनोवृत्ती जर वर्णन करावयाच्या व्यक्तीच्या मनोवृत्तीशी जुळत असेल तर व्यक्तिचित्रात अधिक जिव्हाळा येईल किंवा ज्यावेळी अशी मनोवृत्ती जुळणारी नसेल त्यावेळी एखादा लेखक त्या व्यक्तिचे व्यक्तिचित्र रेखाटणारच नाही. क्वचित प्रसंगी विरोधी मनोवृत्तीचे खंडन

करण्याचा प्रयत्न एखादा आक्रमक वृत्तीचा लेखक करेल परंतू वर्ण्य व्यक्तीचे मूळचे विचार व्यक्तिचित्रात कायम राहतील. व्यक्तिचित्रणातील व्यक्तीचे विचार लेखक बदलू शकतो. त्यावर स्वतःच्या मतांची जबरदस्ती करू शकतो. पण व्यक्तिचित्रातील व्यक्तीचे विचार लेखक बदलू शकत नाही. फारतर ते गाळून अन्य स्वभावरेखा तो रेखाटू शकतो किंवा आपले मत स्वतंत्रपणे व्यक्त करू शकतो. अर्थात हे चांगले की वाईट. त्यामुळे त्या लेखनात प्रचारकीपणा येतो का हा भाग वेगळा. मूळ हेतूवर आक्रमण न होता हा प्रकार झाला असेल तर तो चालू शकेलही परंतु व्यक्तिचित्राचा मूळ हेतू झाकून जर हे मतमतांतरातील प्रकटीकरण अतिरेकी स्वरूपात होऊ लागले तर ते व्यक्तिचित्राच्या मूळ प्रवृत्तीशी विसंगत ठरेल. किंबहुना त्यामुळे 'व्यक्तिचित्र' हे स्वरूपच नाहीसे होऊन त्याला अन्य काहीतरी स्वरूप येईल.

थोडक्यात वरील विवेचनावरून असे दिसून येते की, व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण या दोन संकल्पना व त्यांचे स्वरूप भिन्न आहे. यातील सारखेपण हा दोन्हीही संकल्पना एकमेकात मिसळून टाकण्याइतका गूलगामी आणि व्यापक स्वरूपाचा नाही. त्यामुळे व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यातील फरक, संदर्भ नीट ध्यानात घेऊनच त्या शब्दांचा वापर करावा. 'व्यक्तिचित्रांना व्यक्तिचित्रणे' किंवा 'व्यक्तिचित्रणाला व्यक्तिचित्र' म्हणू नये.

**निष्कर्ष :-**

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यातही खूपच फरक आहे. दोन्हीही संकल्पना व त्यांचे स्वरूप देखील भिन्न आहे. त्यामुळे ज्यावेळी व्यक्तीचे वर्णन साधनरूप असेल त्यावेळी त्याला व्यक्तिचित्रण म्हणावे आणि ज्यावेळी व्यक्तीचे वर्णन साध्यरूप असेल त्याचा हेतू केवळ व्यक्ती वर्णनासाठी व्यक्तीवर्णन असा असेल त्यावेळी त्याचा विचार 'व्यक्तिचित्र' म्हणता येईल काय या शक्यतेसाठी करावा. यावरून या दोन्ही शब्दांत घोटाळा करण्याचे काहीच कारण नाही हे स्पष्ट होईल.

--------

## – संदर्भ टीपा –

1. 'चर्वणा', प्रा.रा.श्री.जोग (1960), पृ. 9

2. 'नाटक एक चिंतन', वसंत कानेटकर, (1974), पृ. 12

3. 'वाड्.मयीन मूल्ये आणि जीवनमूल्ये', ग्रं.ब. ग्रामोपाध्ये (1950), पृ. 121

4. 'आजचे मराठी ललित गद्य : काही विचार', प्रा. वा.ल. कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे प्रकाशन, 1961, पृ. 73

5. 'सुगम मराठी शब्दकोश', श्री.ना. बनहट्टी, भाऊ धर्माधिकारी, (1968), पृ. 387.

--------